# ।। ऊजागर पुर्ष को अंग ।।
# मारवाडी + मराठी
✻

महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।। राम

## ।। अथ ऊजागर पुर्ष को अंग लिखंते ।।

।। कवत ।।

पाप कुमत सुण घात ।। झूट जारी सो निंद्या ।।
म्हेरी खिसे मार ।। मन कूंडे दिस संद्या ।।
जूबा फासी मूठ ।। माय डाकण नही केहे ।।
गोला स्वामी बात ।। निरस पड़दे सब लेहे ।।
बुरी बात नर जे करे ।। बूंझ्याँ कहे न आय ।।
ऊजागर सुखरामजी ।। चौडे देत बजाय ।।१।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की संसारात ज्याने वाईट कर्म केले असतील, तोच लपलेला राहिल.ते आपले वाईट कर्म दुसऱ्या समोर प्रगट करू शकत नाही.परंतु ज्याने चांगले कर्म केले आहे ते कशा करीता लपवून ठेवतील.संसारात अनेक पंथाचे लोक आपल्या धर्माला लपवून ठेवतात.कोणाला सांगत नाही आणि आपला गुरु मंत्र ही कोण्या दुसऱ्याला न सांगता लपवून ठेवतात.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की अरे,लपून तर ते राहतील,ज्यांनी चोरी केली आहे,ते आपली चोरी लपवून ठेवतील.ज्याने पाप केले आहे,ते आपल्या पापाला लपवून ठेवतील आणि कोणी कुबुद्धीने वाईट कर्म केले असेल तो आपल्या कुमतीला लपवून ठेवील,कोणी कोणाचा घात केला असेल,तो लपवून ठेवील.कोणी खोटा,खोटे कर्म केले असेल वा खोटे बोलला असेल तर ते लपवून ठेवतील कोणी परस्त्रीशी व्यभीचार केला असेल तो लपवून ठेवील कोणी कोणाची निंदा केली असेल,तर असे निंदनीय कर्म लपवून ठेवतील.घरात स्त्रीने चिडून शिवी दिली असेल तर ते लपवून ठेवतील मला स्त्रीने शिवी दिली असे तो बाहेर कोणाला सांगणार नाही आणि कोठे ही मार खाऊन आला असेल,तो ही मार खाऊन आलो असे नाही सांगणार.जो कुंडापंथात गेला आहे,तो ही नाही सांगणार की मी कुंडापंथात गेला आहे.जुगार खेळणारा मी जुगार खेळतो,असे कबूल करणार नाही आणि कोणाला फाशी दिली असेल किंवा फासी लावण्याचे कोणावर जाळे रचले असेल तर तो ही सांगणार नाही आणि कोणत्या मनुष्यावर मूठ मारली असेल किंवा जादूगाराकडून मूठ चालवली असेल,तर तो ही बाहेर लोकांना सांगणार नाही.कोणाची माता(आई)डाईन आहे,तो माझी आई डाईन आहे,असे कधीही कोणालाही सांगणार नाही.दोगला(गोला)(रखेल स्त्रीपासून पैदा झालेला,तो सांगणार नाही की,माझ्या आईला अमुकने रखेल ठेवले होते.त्यापासून मी पैदा झालो आहे असे सांगणार नाही.सांगण्याची गरज पडली तर,मी दोगला आहे.असे न सांगता मी दरोगा आहे,असे सांगेल)तसेच आपल्यात कोणताही कमीपणा असेल तर तो सर्व गोष्टी पर्दात

लपवून ठेवील(अशी निरस गोष्ट बाहेर सांगणार नाही).जे-जे मनुष्य वाईट गोष्टी करतात.ते त्याला विचारल्यावरही सांगणार नाही,परंतु आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,जो उजागर आहे,ते आपली गोष्ट खुल्लम-खुल्ला(उघड-उघड)एकदम प्रगट रूपाने ठोकून सांगतात.असेच सर्व धर्मात,ज्याच्यात काही कमीपणा राहिल किंवा वाईट रीत असेल,तेच प्रगट रूपाने बाहेर सांगणार नाही,परंतु ज्याचा धर्म उत्तम आहे आणि चांगला तसेच निर्मळ आहे ते कशा करीता लपवून ठेवतील.उजागर तर आपला धर्म प्रगट रूपाने बजाऊन सांगतील असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।१।।

ज्यां पाया तत्त भेद ।। प्रगट सो किया पसारा ।।
सिष चेला पंथ थाप ।। ग्यान सो ग्रंथ ऊचारा ।।
ठाम ठाम पर धाम ।। जुग मेळा सो कीया ।।
भिन भिन्न कर समझाय ।। भेद प्रमात्म दीया ।।
लादो सोही क्हे गया ।। प्रगट जग के माय ।।
पायो ज्याँ सुखराम के ।। क्हो कुण रख्यो छिपाय ।।२।।

आधी ही ज्यांना ज्यांना या तत्तचा(सतस्वरूप ब्रम्हचा)भेद मिळाला आहे,ते आपल्या संसारात,प्रगट फैलाव करून गेले.त्यांनी शिष्य आणि चेले केले आणि आपल्या पंथाची स्थापना केली आणि आपल्या ज्ञानाचा ग्रंथ उच्चारण करून सर्वांना आपले ज्ञान सांगून गेले.त्याच्या मागे जागो-जागी त्यांचे धाम बांधले गेले आणि संसारात त्यांचे मेले(यात्रा) होत असते.(आपला धर्म)वेग-वेगळा करून सर्वांना समजावून परमात्म्याचा भेद सांगितला.आधीही ज्याला जे प्राप्त झाले,त्यांनी संसारात सर्वांना प्रगट रूपाने सांगितले. आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,ज्याला प्राप्त झाले आहे,त्याने सांगा काही लपवून ठेवले आहे का आणि कोणी लपलेला राहिला आहे का?लपून तर ज्याला काही मिळाले नाही,तेच लपून राहतील.।।२।।

प्रसराम मत्त हरत ।। राज रघूनाथ जमायो ।।
किस्न पख सुण बांध ।। नाँव अपनो जस गायो ।।
बाँध्यो पंथ कबीर ।। गुराँ बिच राहा चलाई ।।
आदनाथ पख खेंच ।। जैन क्रिया बिध गाई ।।
बिना ध्रम बिन पखरे ।। क्हो कुण हे जग माय ।।
सुण मुर्ख सुखराम के ।। अेकी मोय बताय ।।३।।

आधीही परशुरामाने मत्त हरण करून रामचंद्रने आपल्या राज्याची स्थापना केली आणि कृष्णाने गीतेमध्ये आपला पक्ष बांधून आपलेच नाव,आपलेच यश,जे आहे ते मीच आहे,माझ्या शिवाय काहीही नाही,असे वर्णन केले आहे.कबीरने आपला कबीर पंथ

स्थापन करुन आपले गुरु रामानंदापासून वेगळाच रस्ता चालवला आणि आदिनाथ (ऋषभदेवाने)आपला पक्ष घेवून,जैन धर्माची सर्व क्रिया आणि विधि वर्णन केली.या ऋषभदेवाने जैन धर्माची स्थापना केली,तर धर्माच्या शिवाय आणि पक्षाशिवाय(पंथा शिवाय)संसारात कोण आहे.अरे मुर्ख ऐक,असा एखादा ही शोधून मला दाखव,असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।३।।

जीवाँ तारण ज्हाज ।। संत सिर्ज्या जग माही ।।
बाणी चली सुबास ।। सब्द प्रदेसा जाही ।।
सुण सुण जागे जीव ।। सकळ सोई द्रसण आवे ।।
भँवर बिलुंबे कंवळ ।। भुजंग ऊड चंदण जावे ।।
साध छिपाया क्यूं छिपे ।। ऊजागर जग माय ।।
सुर्ज ऊगा सुखराम के ।। किस्कूं सुझे नाय ।।४।।

जीवाला तारण्याकरीता जहाज काय आहे,असे म्हणाल तर जीवाला तारण्याकरीता सतस्वरुपी संताच्या रुपात जहाज उत्पन्न केले गेले.हे संत जीवांना तारण्याकरीता जहाज आहेत.तर असे जहाजरूपी संत लपून राहिल्याने त्यांच्याने जीव कसे तरतील आणि ते जहाजरूपी संत लपून कशाकरीता राहतील?ते तर जीवाला तारण्याकरीताच आले आहेत.त्या संतांची वाणी(ज्ञान)हे त्यांची सुगंधी आहे.त्यांची शब्द(ज्ञान)रूपी सुगंधी देशा देशा मध्ये प्रदेशात जाते आहे.त्यांची वाणी ऐकून ऐकून सर्व जीव जागृत होतात.ज्ञानाला समजू लागतात.भक्ती करू लागतात.ते सर्व जीव संतांच्या दर्शनाला येतात.जसे भवरा कमळावर जाऊन मुग्ध होवून जातो.जसे भुजंग(सर्प)चंदनाच्या झाडाला लपेटून जातो.चंदनाच्या झाडाला लागल्याने सर्पाला शितलता मिळते.तसेच संतांच्या जवळ गेलेल्या जीवाला शांतता येऊन जाते(मिळते).आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,संसारात जे उजागर आहेत ते साधू लपलेले कसे राहतील?सूर्य उदीत झाला(उगवला)आणि कोणी म्हणेल की,मी या सूर्याला लपवून ठेवील तर सूर्य लोकांना दिसल्याशिवाय राहील का?(आहे का?)।।४।।

किसन देव कूं जोय ।। हनू तुलछी नही मान्यो ।।
ब्यास भागवत माय ।। स्मज गोरख नही आन्यो ।।
दत्त देव कूं संत ।। मुख गेहे र रख्यो नाही ।।
रामानंद कबीर ।। सिष गुरू ऊळझ्या माही ।।
भक्त माळ नाभे कही ।। बण्यां संत अनेक ।।
दादू कूं सुखराम के ।। माही धन्या नही देख ।।५।।

असेच साधू सूर्यासारखे लपणार नाही. काही जीवांना सूर्य दिसत नाही. जसे घुबड,

वटवाघुळ,चमचेडी(पाकळी)इत्यादी यांना सूर्य दिसत नाही.म्हणून सुर्यात काही कमतरता आहे हे समजू नका.तसेच संतांना कोणी एखादा मानत नाही तर त्या संतात काहीही कमीपणा येत नाही.जसे कृष्णाला पाहून हनुमानाने आणि तुलसीदासाने मानले नाही तर यांच्या न मानन्याने कृष्ण काही कमी नाही झाला.एकवेळ कृष्णाचा जन्म झाल्यावर राम जन्मला असे ऐकून मारूती बघायला गेला आणि तेथे कृष्णाला पाहून मारूती बोलला,हा तर माझा मालिक नाही.माझे मालक तर राम आणि सीता आहे. असेच एक वेळ तुलसीदास ब्रज गेले आणि तेथे सर्वांना राधे-राधे असे भजन करताना पाहून तुलसीदास बोलले.

।। दोहा ।।

**।। राधे राधे रटत है ।। आक टाक अरु केर ।।**
**।। तुळसी बृज बासीनते ।। काहा रामसे बेर ।।**

आणि नंतर तुलसीदास एका मंदिरात गेले होते.तेथे एका पुजाऱ्याने दोहा सांगितला,तो असा आहे.

।। दोहा ।।

।। अपणा अपणा इष्टकूं ।। नमन करे सब कोय ।।
।। इष्ट बिहूना मानवी ।। नमे सो मुरख होय ।।

हे तुलसीदास मूर्ति पूजक होते.ते दगडाच्या मूर्तिला मानणारे होते.त्यांनी त्या मंदिरात जावून नमस्कार न करता दोहा म्हटला.

।।दोहा।।

**।। कहा कहू छबी आजकी ।। भले बने हो नाथ ।।**
**।। तुलसी मस्तक जब नमवे ।। धनुष्य बाण गही हाथ ।।**

तुलसीदासाने त्या मूर्तिला नमस्कार न करता दोहा म्हटला,की मी कृष्णाच्या मुर्तिला नमस्कार करणार नाही.रामाचे रूप धारण करा तर मी नमस्कार करीन.तेव्हा त्या मूर्तिने कृष्णाचे रूप बदलून रामचंद्राचे रूप धारण केले अशी कहावत आहे.(कथा)(म्हण)

।। दोहा ।।

**।। कित मुरळी कित चंद्रिका ।। कित गोपीयन को साथ ।।**
**।। अपना जनके कारणे ।। कृष्ण भयो रघुनाथ ।।**

असे म्हणतात कृष्णाची मूर्ति रघुनाथ कशी बनली कोण जाणे.तर मारूती आणि तुलसीदासने कृष्णाला मानले नाही.तरी ही कृष्ण काही कमी नाही झाला(तसेच कृष्णव्दैपायन)व्यासाने भावगत(कथन केले).परंतु त्याच्यात(भागवतामध्ये)गोरखनाथाला आणले नाही.(जर व्यासाने गोरखनाथाला आणले नाही,तरी ही गोरखनाथ काही कमी नाही झाला)एके वेळी दत्तात्रयाला ब्रम्हा,विष्णु,महादेवाने विचारले तुम्ही कोण आणि कोणाचे पुत्र आहात?आणि कोणाचे ध्यान करतात?

।। चौपाई ।।

(तेव्हां दत्तात्रय म्हणाले, )

तेव्हा दत्तात्रय बोलले–

**।। मैं तीन देवका पुत्र कहाऊँ ।।**

**।। अरु ब्रह्म ध्यान हिरदामें लाऊँ ।।**

अशा तऱ्हेने दत्तात्रय त्रिदेवांशी बोलले,मी तीन देवांचा पुत्र आहे परंतू तीन देवांची भक्ती न करता हृदयात सतस्वरूप ब्रम्हाचे ध्यान करतो.अशाप्रकारे दत्तात्रेय ब्रम्हा,विष्णु, महादेव यांच्या पेक्षा अधिक होता.तरीही या तिन्ही देवांनी दत्तात्रयाला उच्चपदाचा संत मानले नाही.ब्रम्हा,विष्णु,महादेवाच्या न मानन्याने दत्तात्रेय काही कमी होऊन गेले का?असेच रामानंद आणि कबीर(हे आपसात एक दुसऱ्यांचे शिष्य आणि गुरु असे अडकलेले होते)रामानंद हे कबीराचे गुरु होते,परंतु नंतर कबीराने रामानंदाना ज्ञान देवून समजावले आणि सतस्वरूपाला पकडायला(धारण करायला)सांगितले आणि दुसरा मायेचा पक्ष सोडण्यास सांगितले.अशाप्रकारे रामनंदाला कबीराने ज्ञान दिले तरीही रामानंदाने कबीराला काही अधिक मानले नाही तरीही कबीर हा रामनंदापेक्षा कमी झाला नाही.तसेच नाभा नावाचा एक भक्त झाला त्याने(भक्तमाळेत)अनेक संतांचे वर्णन केले,परंतु त्यात दादूजीचे वर्णन केले नाही.नाही करण्याचे कारण हे आहे की, दादूजी आणि नाभा एकाच समयी(वेळी) झाले होते.नाभा हा सगुण उपासक होता आणि दादूजी हे निर्गुण उपासक होते.हे दादूजी कंठी आणि तिलक(टीळा)धारण करीत नव्हते, म्हणून नाभा दादूजींना जाऊन बोलला,मी भक्तमाळ बनवित आहे.त्यात अनेक भक्तांचे वर्णन केले आहे,तर तुम्हीही कंठी आणि तिलक(टीळा)धारण कराल तर त्या भक्तमाळेत तुमचेही नाम टाकून देईन.तेव्हा दादू साहेबांनी एकदम नकार दिला की,मी निर्गुण उपासक आहे.तुमच्या भक्तमाळेत येण्याकरीता कंठी आणि तिलक धारण करणार नाही. तेव्हा नाभा बोलला की तुम्ही कंठ आणि तिलक धारण करणार नाही,तर मी तुम्हाला भक्तमाळेत आणणार नाही.तेव्हा दादूजी बोलले की, नाही आणणार तर नका आणू. भक्तमाळेत तू जर नाही आणणार तर नंतर दुसरा कोणी भक्तमाळ बनवेल तो मला आणेल.अशाप्रकारे सांगितले म्हणून नाभाने दादूजींना भक्तमाळेत आणले नाही.जर नाभाने दादूजीला मानले नाही,तर ते दादूजी नाभापेक्षा कमी झाले का?नाभापेक्षा दादूजी खूपच उच्च पदाचे भक्त होते.ही नाभाची समज घुबडा सारखी होती की ज्याला दादूजी सारखा सूर्य दिसला नाही.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।५।।

कुंडल्या ।।

**याँ याँने नही मानीया ।। क्हा कमता अे होय ।।**

**तीन लोक के बीच मे ।। धिन धिन्न क्हे सब लोय ।।**

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

धिन धिन क्हे सब लोय ।। धाम बंधग्या जग माही ।।
मिल्या ब्रम्ह मे जाय ।। कम कसर कुछ नाही ।।
गुघू कूं सुखराम के ।। सुरज न दीसे कोय ।।
आं याँने नही मानीयाँ ।। क्या कमता अे होय ।।६।।

कृष्णाला मारूती आणि तुलसीदासने,गोरखनाथाला व्यासाने,दत्तात्रयाला ब्रम्हा,विष्णु, महादेवाने,कबीर साहेबाला रामनंदने आणि दादूजीला नाभाने अशा रीतिने मानले नाही. तर हे यांच्यापेक्षा काय कमी झाले.यांना तिन्ही लोकांत सर्व धन्य धन्य म्हणतात. संसारात कृष्णाचे द्वारकेत,गोरखनाथांचे गोरखपुर,दत्तात्रयाचे गिरनार आणि माहोर आणि कबीरजीची काशी,दादूजींचे नाराणा या जागेवर यांचे धाम बांधले गेले आणि हे सर्व सतस्वरूप ब्रम्हात जाऊन मिळून गेले.यांची कोणत्याही प्रकारची कमतरता किंवा कसर राहिली नाही.जर घुबड बुद्धीचे मारूती,तुलसीदास,व्यास,ब्रम्हा,विष्णु,महादेव, रामानंद आणि नाभा इत्यादींनी सूर्यरूपी(कृष्ण,गोरखनाथ,दत्तात्रय,कबीर साहेब आणि दादूजीला)मानले नाही तर यांच्या अपेक्षेत कमी होऊन गेले का,असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।६।।

कवत ।।

मे तो देव असल हूं साचो ।। तिन मे फेर न सार ।।
तुं सुण गोल गम हे रासभ ।। पाखंड ले सिर धार ।।
भर्डे केसो भेष बणायो ।। दुनिया कूं ठग खावे ।।
अंतकाळ सब ही पिस्तासी ।। जे तुज बूझण आवे ।।
साची सबे मान तुम लीज्यो ।। बेद भागवत जोय ।।
के सुखराम बिना ऊजागर ।। कळजुग भर्डा होय ।।७।।

मी तर देव असली आहे आणि मी देव सत्य आहे.याच्यात माझे देव होण्यात काहीही फेर–फार नाही.परंतू तू दोगला(रखेलचा मुलगा)आहे तुझ्या आत बुद्धी गाढवा सारखी आहे.तू पाखंड घेऊन आपल्या शिरावर धारण केला आहे,तू पाखंडी आहे.तू बहूरूपीया आणि भांड सारखे ढोंग केले आहे आणि वेश धारण करून दुनियेला ठगून खातो.तुला जे पूजायला येतील,ते अंत समयी पश्चाताप करतील ही गोष्ट मी तुला सांगतो ती सत्य मानून घे.वेदात आणि भागवतात पाहून घे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,जो उजागर नाही आहे,ते कलियुगात बहुरुपीया सारखे,ढोंग करणारे,वेशधारी असतात.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।७।।

साखी ।।

बादी आदम देहे मे ।। ज्यूँ पंछयाँ गुघू जोय ।।
यूं ग्यान मे सुखराम के ।। बिन भेदी नर होय ।।१।।

वादी(वादविवाद करणारा)हे मनुष्य देहात असे आहे,जसे पक्ष्यांमध्ये उल्लू आहे(घुबड). तसेच ज्ञानींमध्ये बिनभेदी जे भेद जाणत नाही ते मनुष्य घुबडासारखे आहे,असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।१।।

**राम नाम मुख बोलीया ।। सो मेरा गुरू होय ।।**
**दूजा सब सुखराम के ।। सिष साखा सुण लोय ।।२।।**

जे मुखाने रामनाम बोलतात ते माझ्या गुरु सारखे आहेत.दुसरे सर्व मनुष्य शिष्य शाखा आहे.हे सर्व लोक ऐकून घ्या.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।२।।

**ज्याँ पूज्याँ अे लोक मे ।। यांही सुख नही कोय ।।**
**तां कूं सुण सुखराम के ।। वां कैसे सुख होय ।।३।।**

ज्याला जेथे पूजल्याने पूजणाऱ्याला येथे सुख होत नाही,तर त्या पूजणाऱ्याला,पुढे सुख होत नाही.ज्याची भक्ती करुन येथे दु:ख भोगतात,त्या भक्ती करणाऱ्याला पुढे सुख कसे होईल.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।३।।

**लल फल सुखराम के ।। हर नही माने कोय ।।**
**तन बिन अरप्याँ पीव कूं ।। फर्जन केसे होय ।।४।।**

ललफल(हांजी–हांजी केल्याने)तोंड देखली गोष्ट केल्याने,हार मानणार नाही,कबुल करणार नाही जसे स्त्रीने आपले शरीर आपल्या पतीला अर्पण केले नाही तर तिला मुले कसे होतील?असेच हांजी–हांजीच्या गोष्टींनी हर खुष होणार नाही आणि मोक्षफळ प्राप्त होणार नाही.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।४।।

**मूळ गहयाँ मे क्या मिले ।। फळ डाळा मे होय ।।**
**बिन बादळ सुखराम के ।। बिरखा सुणी न कोय ।।५।।**

कोणी म्हणेल की,मी जड(मूळ)पकडून बसलो आहे.तर जड पकडून काय होणार,फळ तर फांदीमध्ये आहे.(जसे जड ब्रम्ह आहे,त्याचे ब्रम्हा,विष्णु,महादेव फांद्या आहेत तर फांद्यांमध्ये ही फळ मिळणार नाही.हा सारा संसार डहाळी आणि पत्ते आहे या डहाळी आणि पत्यांमध्ये ही फळ नाही आहे.संतजन जे आहेत,ते झाडांचे फुल आहे.त्या संतजनात ज्ञानरूपी फळ आहे, म्हणजे ज्या बीजापासून हा वृक्ष तयार झाला ते बीज त्या फळात आहे.त्या संतांचे ज्ञानरूपी फळ जे खातात ते मग्न ज्ञान,ध्यानात होतात. जसे नभ आल्याशिवाय पाऊस येत नाही.तसेच गुरुच्या शिवाय ज्ञान मिळू शकत नाही. गुरु आहेत ते नभांसारखे,जसे ढगांपासून वर्षा(पाऊस)होतो,तसेच गुरुपासून ज्ञान प्राप्त होते.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।५।।

**मूळ गहयाँ बिन बाहेरो ।। ऊँचो चडयो न जाय ।।**
**फळ ही सुण सुखराम के ।। गोड गहे तो खाय ।।६।।**

जड(मूळ)पकडल्या शिवाय उंच चढले जात नाही.झाडाला पकडून वर चढाल तेव्हा खायला फळ मिळेल,असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।६।।

**क्रणी कर निर्बळ रहे ।। आपो गहे न काय ।।**
**ताँ के बळ सुखराम के ।। ज्हाँ तहाँ राम स्हाय ।।७।।**

जे करणी करुन निर्बळ राहतात.करणीची भक्तीची काहीही घमंड राखत नाही(ठेवत नाही).अहंमपणा ही ठेवत नाही की मी भक्त आहे,ज्ञानी आहे अस अहंपणा ही ठेवत नाही,त्याचे बळ आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,जेथे तेथे त्याची राम सहायता करतात असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।७।।

।। इति ऊजागर पुर्ष को अंग संपूरण ।।